या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार २२ जून २०२४ | अंक१९५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# सगेसोयऱ्यांचे खोटे दाखले घेणाऱ्या आणि देणाऱ्यांविरोधात कारवाई होणार, बैठकीत निर्णय

## राज्यात ओबीसी-मराठा असा संघर्ष पेटत चालल्याचं चित्र निर्माण झालं आहे..

**मुंबई / प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांची ओबीसी समाजाच्या मागण्यांची महाबैठक आज पार पडली. सह्याद्री अतिथी गृहामधील या बैठकीला ओबीसी समाजाचे नेते आणि मंत्रीमंडळील मोठे मंत्री यांच्यासह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित होतं. या बैठकीमध्ये ओबीसी समाजाच्या कोणत्या मागण्या याबद्दल छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली. सर्वात महत्त्वाचं म्हणजे सगेसोयऱ्यांचे खोटे दाखले घेणारे आणि देणाऱ्यांवर मोठी कारवाई होणार असल्याची माहिती





भुजबळ यांनी दिली. काही ठिकाणी खोट्या नोंदी करत तिथे खोटे दाखले देण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप छगन भुजबळ यांनी याआधी एका पत्रकार परिषदेमध्ये केला होता. याचाच धागा पकडत पत्रकाराने त्यांना प्रश्न केला की याबाबत बैठकीमध्ये काही ठरलं का? यावर बोलताना खोटे प्रमाणपत्र देणारे आणि घेणारे हो दोन्ही गुन्हेगार असून त्यांच्यावर कारवाई होणार असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं असल्याचं छगन भुजबळ यांनी म्हटलं सांगितलं. काही मंत्री आम्ही उद्या पुणे आणि वडीगोद्रीला जाऊन समजावून सांगणार आणि त्यांना विनंती करणार. उपोषण मागे घ्यायला सांगणार. दोन चार दिवस आराम करायला सांगणार. त्यानंतर सर्वपक्षीय बैठकीत त्यांना भाग घेता येईल असं सांगणार. आम्ही सात आठ मंत्री जाणार आहोत. आम्ही जे आहे ते बोलू. त्यावर त्यांचा विश्वास बसेल. छगन भुजबळ बोलतोय. मी ओबीसींचा लीडर आहे. मी जेव्हा शिष्टमंडळ घेऊन जात आहे. तेव्हा माझी लोकं माझ्यावर विश्वास ठेवतील असं भुजबळ म्हणाले. दरम्यान, ओबीसी नेत्यांचे जे प्रश्न आहेत.त्याचं उत्तर देऊ. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सकारात्मक आहे. त्यांनी काही गोष्टी मानल्या आहेत. अधिवेशनाच्या काळात सर्व पक्षीय बैठक घेऊन त्यात सर्व मुद्दे मांडणार असल्याचं सरकारने सांगितल्याचं भुजबळांनी म्हटलंय.

## जासई हायस्कूल मध्ये योग दिन साजरा.



**उरण/प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई, ता. उरण जि.रायगड या विद्यालयात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग सर यांनी प्रमुख पाहुणे व योग प्रशिक्षक म्हात्रे एस.जी.यांचे स्वागत करून योग दिना बद्दल व योगाचे जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना विशद करून सांगितले. विद्यालयाच्या प्रांगणात योग प्रशिक्षक म्हात्रे. एस. जी यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता पाचवी ते बारावी अखेरच्या विद्यार्थ्यांनी योगाची अनेक साधी सोपी आसने केली. विद्यार्थ्यांच्या समवेत सर्व शिक्षक व सेवक वर्ग सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. अतुल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन गताडी एस.बी. यांनी केले.

## खर्डा :येथील रयत शिक्षण संस्थेच्या खर्डा इंग्लिश स्कूल खर्डा विद्यालय , कनिष्ठ महाविद्यालय व आर्ट ऑफ लिविंग परिवार खर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

**प्रतिनिधी** येथील खर्डा इंग्लिश स्कूल खर्डा विद्यालयाच्या प्रांगणात सुमारे १९०० विद्यार्थी पट संख्या असणाऱ्या शाळेमध्ये योग, प्राणायाम, सूर्यनमस्कार ,मेडिटेशन, ध्यान आदी सामुदायिक कृती करून विषयाची सखोल माहिती देऊन आर्ट ऑफ लिविंग चे प्रशिक्षक संतोष थोरात यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांना माहिती देऊन योगाचे धडे दिले. मोठ्या संख्येने असलेल्या विद्यार्थ्यांच्या या कार्यक्रमांमध्ये योग प्राणायाम ध्यान मध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षकही मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनीही विद्यार्थ्यांबरोबर योगासने, प्राणायाम, ध्यान केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य मुस्तफा सय्यद, क्रीडा शिक्षक



शरद शिरसाठ, प्रा. रावसाहेब केंद्रे, प्रा शिवशंकर ठाकरे, प्रा रामनाथ ढाकणे, प्रा गणेश शिंदे ,प्रा तुकाराम विधाते, प्रा मुक्तेश्वर फामदे, प्रा अभिलाषा वांढरे, शारदा बोळे, सविता पवार, मनीषा कोल्हे ,प्रियाली बुडे यांच्यासह आर्ट ऑफ लिविंग चे रवींद्र कुलकर्णी, गणेश जोगदंड, वैशाली थोरात,निरज पवार ,नितीन राळेभात, बाळासाहेब गोपाळघरे, प्रकाश सोनटक्के यांच्यासह विद्यालयाचे शिक्षक यांनी परिश्रम घेऊन मोठ्या उत्साहात मेगा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला.

## ग्रामीण रुग्णालय नायगाव येथे जागतिक योग दिन साजरा

**नायगांव /प्रतिनिधी**

शहरातील ग्रामीण रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जागतिक योगा आज दिनांक 21 जुन रोजी जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी रुग्ण व तसेच रुग्णालयातील नातेवाईक यांना योगा बद्दलची सर्व फायदे व तसेच योग्य तज्ञ श्रीमती मंजिरी जोशी मॅडम यांच्याकडून योगाभ्यास तसेच मार्गदर्शन करण्यात आले. रुग्णातील सर्व



कर्मचारी तसेच नातेवाईक यांना सखल मार्गदर्शन योगा बदल देण्यात आला. यावेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर प्रशांत सोनकांबळे साहेब यांच्या आदेशावर श्रीमती डॉक्टर मंजुषा विश्वास पाटील चव्हाण तसेच श्रीमती काटे मॅडम यांनी रुग्णालयातील उपस्थित कर्मचाऱ्यांना योगाभ्यास करून घेतले यावेळी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर इरफान पठाण तसेच डॉक्टर जावेद सर श्रीमती शेख मॅडम तसेच हनुमंत पाटील उमरेकर उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून झाली यावेळी योगातील वेगवेगळ्या योगासने प्रात्यक्षिक करून दाखवले यामुळे ग्रामीण रुग्णालयात योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला

## प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा

**सोलापूर/प्रतिनिधी**

शुक्रवार दिनांक २१ जून २०२४ रोजी कव्हे ता. माढा येथील प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे येथील प्रशालेच्या क्रीडांगणावर १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साह साजरा करण्यात आला इयत्ता ५ वी ते १० वी सर्व विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कृतीयुक्त मार्गदर्शन



मुख्याध्यापक यादव सर, लठ्ठे सर, आतकर सर, घाडगे सर यांनी केले. सदर प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक यादव सर यांनी विद्यार्थ्यांना निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी दैनंदिन जीवनात नियमित योग करणे याबाबतचे महत्त्व सांगितले व आजपासून योग करण्याचे आव्हान केले.

## श्री.गजानन विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज व बसवंतराव पाटील इंग्लिश स्कूल येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा

**गंगापुर प्रतिनिधी**

श्री गजानन प्राथमिक व माध्यमिक विद्यामंदिर, श्री गजानन ज्युनिअर कॉलेज, बसवंतराव पाटील इंग्लिश स्कूल यांच्या सयुक्तविद्यमानाने शाळेत जागतिक योग दिन डॉ सत्यजित कुबेर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने करण्यात आली . संस्थेचे अध्यक्ष ईश्वर जाधव , संस्थेचे सचिव हरिष जाधव,





प्राथमिक मुख्याध्यापिका सुरेखा बस्वदे, माध्यमिक मुख्याध्यापक मण्णाजी शिनगारे, योग गुरु श्री सतीश काळे दिलीप सोनवणे राजू करपे स्नेह साळवे जयश्री गोरे ऋतुजा गांजकर उपमुख्याध्यापक शहाजी मंगनाळे, प्राथमिक विभाग प्रमुख मनीषा नवथर, माध्यमिक विभाग प्रमुख प्रा संजय तुपे, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक भाऊसाहेब शिरसाठ, रेखा बिदरकर, यांच्या हस्ते, प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. तसेच या प्रसंगी सतीश काळे, दिलीप सोनवणे, राजू करपे , स्नेहल साळवे ,जयश्री गोरे, ऋतुजा गांजकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती. मनीषा नवथर व आभार प्रदर्शन मण्णाजी शिनगारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक तारडे, परमेश्वर गीते, संदीप हिंगणकर सौरभ लगड, सुनील शिंदे, उल्हास वाघ, , अश्विनी सूर्यवंशी, स्वाती सूर्यवंशी, उज्वला सवई, गंगासागर बोराडे, संजीवनी चिकाळे, गुलाब मोहिते, छाया वाघदरे, निकिता देशमुख, जयश्री पाटील, , दिपक पठारे, पूजा गिरी, जबार पठाण, विनय अवसरमल, विनायक वाघमारे, प्रल्हाद मंगनाळे आदीनी परिश्रम घेतले.

## कविता

### बाप

बाप कष्टाचा सालदार
माय कष्टाची ओसरी.....
चिल्यापिल्यांचा पसारा
त्यांच्या अंगणाची बासरी....१

नाही घेतड कापड
कधी स्वत:च्या रे साठी.....
लुगडं नविन आणलं
त्यान माझ्या मायेच्या रे साठी...२

काम करून पडलं
चांद अंगा खांद्यावरी...
रडता रडता रे बापानं
हसू दावल चेहऱ्यावरी.....३

भेगा पडल्या पायाला
कळा सोसल्या काळजावरी...
कधी नाही रे थकला
न्यारी खावून हातावरी......४

बाप किती रे रुजला
माय काळीच्या रे दारी.....
कष्टा फळ दे ग माई
कर धान्याची सराई.....५

बाप मनातूनी बोले
कधी फुलेल वनराई......
जोडीला अशीच राहू दे
माझ्या गरिबीची रूखमाई..६

कसा सांगू मी गारहान
माह्या काळीची पुर्वाई.....
हात जोडून सांगतो
सुखी ठेव रे ठाई ठाई.....७

कवी/साहित्यिक/समाजसेवक,
गजानन भागाजी दराडे
मु.तढेगाव पो.दुसरबीड
ता.सिंदखेडराजा

# तिमिरातून तेजाकडे

रात्रीचा गडद अंधार सरत आला होता पहाटेचे वातावरण थोडे वेगळेच भासत होते .चालताना धुक्यातून थोडेफार वाट दिसत होती . पुढचं काही दिसत नसेल तर चालताना स्पष्ट दिसत होता . सूर्याचा आगमनाची चाहूल लागली होती . संपूर्ण आकाशात नारंगी रंगाचे चादर पसरत होते . पक्षांचा किलबिला थोडाफार चालू होता .मध्येच एखादा पक्षी आपल्या घरट्यातून डोकावत होता कदाचित त्याला वाटलं असावं की बहुतेक सूर्य आला आहे आणि आपल्या पिल्लांसाठी आपल्याला बाहेर नक्कीच जावं लागेल . सूर्य हळूहळू डोंगरातून दिसू लागला तो देखील डोकाव लागला हे रूप बघण्यात एक वेगळेच कुतूहल असते . शांत निरागस सूर्याचे रूप थोड्या काही तासानंतरच अक्राळ विक्राळ रूप धारण करतात. धुकं हळूहळू कमी होत होतं साधारण सकाळ होत आले होते .पहाट संपून रात्रीचा गडद अंधार संपून एक प्रकारचे प्रकाश येत होता . आकाशातील संपूर्ण हातावरण हे विलोभिने झालो तर सूर्यदर्शन झालं होतं . आकाशात लाल रंगाची संपूर्ण दृश्य दिसत होतं. घरट्यातून पक्षी अन्नाचे शोधात बाहेर पडत होते . पिल्ले आई लवकर परतावी या आशेने पुन्हा झोप घेण्यात गुंग झाली असावी .सभोवतांचे वातावरण अत्यंत विलोभनीय झाले होते. वारा हळूहळू या वातावरणात रंग भरत होता .” असा बेभान हा वारा “ हे जणू गाणी त्या वातावरणाला एकरूप होत होते. धुक्याची चादर निवळत आली होती . सोबतचे झाडे डौलाने मिरवत होते . पाने सळसळ करत आपले नाव अस्तित्व दाखवून देत होते .छोटी छोटी रोपटे नव्याने डोल निर्माण करत होते .रस्त्यातून एखादे वाहन जात होतं . त्या आवाजातून रस्त्यावर एक वेगळीच कंपनी निर्माण होत होते .सकाळचा हा उत्साह वाढवणारा वातावरणातील बदल मनाला स्पर्शून जात होते . रस्त्यावरून जाताना स्पष्ट दिसत होते दाटलेल दाठ धुके आणि त्यातून मार्ग काढत जाणारी अनेक ईच्छा अपेक्षा . अंधारातून जाताना सोबत एका कंदील चा प्रकाश सुद्धा पुरेसा असतो . आज नाहीतर उद्या निश्चित ठिकाणी पोहचू हे हीच रोजची भावना या अंधारातून प्रकाश कडे जायला भाग पडते . काहीच नाही या पेक्षा कंदील आहे हे समाधान उद्याचा प्रकाश घेऊन येतो ... घाटमार्गातून जाताना बस हळू हळू निघते आज घाट असेल पण उद्या उतार नक्की येणार हे वास्तव आहे .पण नशिबात घाट च आहे हा मानवी भावनेचा स्वभाव उद्याची अनेक सुखे त्या घाटातच मुकतात .आपले आजचे प्रयत्न उद्याचा प्रवास ठरवतात .नवनिर्मितीच्या प्रक्रियेत सूर्या सोबत होणारे सकाळ नवनिर्मिती नक्कीच होत असेल .सकाळचे निरागस वातावरण आपला मनापासून निर्माण करतो .एक सकारात्मक ऊर्जा घेऊन दिवसाच्या सुरुवात होते .यापेक्षा चांगलेच नक्कीच वेळ कोणतीच नसावी .आपल्याला एखादी सवय लागावी तर ते त्याची सुरुवात ही नक्कीच सकाळपासून करावे .नवनिर्मितीची सुरुवात प्रांजळपणे होणे सकाळीच घडत असते . रात्रीचा गडद अंधार मिटवून तिमिरातून तेजाकडे जाणारे सकाळचे रम्य पहाट सूर्याचे येणे काहीच दिसत नसताना पण सूर्याच्या हळू येणे नवा काळ नक्कीच सुरू होते आणि आपले जन्म आणि आपलं वय किती असेल पण झोपेनंतर पुन्हा सकाळ होते आणि आपलं नवा जन्म होतो या नव्या सकाळ सोबत होतो. कालचा क्षण तो दिवस काल होता आणि या पहाटेचा धुके अनेक गोष्टी दिसत होते . या सकाळच्या पहाटेसारखे रोज आपल्या आयुष्यातला आपला जन्म होतो .निर्मितीचा हाच तो काळ अत्यंत उपयोगी भूतकाळाच्या कालचा गडद आठवणी विसरून वर्तमाननात आणण्याचे काम हे सकाळची सुंदर पहाट करते व हा सूर्योदय भविष्याची चाहूल नक्कीच देत असावा . म्हणूनच कालच्या गडद रात्रीपेक्षा आजची नवीन सुरुवात केलेलं कधीही नक्कीच चांगलं .त्यामुळेच स्वत:च्या नवनिर्मितीसाठी किंवा स्वत:च्या आयुष्याच्या नवनिर्मितीसाठी जर कुठला क्षण असेल तर तो आपल्या आयुष्यातील पहाटेतून निर्माण झालेल्या सकाळचा आयुष्याची नवी पहाट करून नवी सुरुवात करूया .

**गिरीशकुमार माधुरी तुकाराम कांबळे**
**कोल्हापूर**

# जन्मभूमी आपेगावतून ज्ञानोबारायांच्या पालखीचे २८ जूनला प्रस्थान



## माऊलींच्या वारीची ८४७ वर्षांची परंपरा

**बीड/प्रतिनिधी**
पंढरीची वारी ही तेराव्या शतकातील संत नामदेव संत ज्ञानेश्वरांच्या अगोदरही होत असल्याचे दाखले मिळतात. मूळचे मराठवाड्यातील असलेल्या संत नामदेवांच्या घराण्यातील ही अनेक पिढ्यांची पंढरीची वारी होती .तर संत ज्ञानदेवांचे आजोबा त्र्यंबक पंतही आपेगावहून पंढरीची वारी करत होते. पंढरीच्या या वारीला प्राचीन इतिहास आणि परंपरा आहे. वारीचा उल्लेख असलेले संत ज्ञानदेवकृत अभंगातून कागदोपत्री ठोस आधार मिळतो. संत ज्ञानदेवांच्या घरामध्ये पंढरीची वारी होती या सर्व ठोस पुराव्यावरून आपेगाव ते पंढरपूर वारी गेली हजार-बाराशे वर्षे अखंड सुरू असल्याचे स्पष्ट होते.उन्हाळा संपतो आणि वारकऱ्यांना पंढरीची आस लागते. अभंग गात गात, खेळीमेळीने ,आनंदाने नाचत, गर्जत विठ्ठल नामाचा जयघोष करीत वारकरी ही पायी वाटचाल करतात. भजन गात, नाचत ,पंढरीकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या या दिंड्या म्हणजे चैतन्याचा प्रवाह. या दिंड्यांचे दृष्यही चित्त प्रसन्न करणारे असते.

आपेगाव ते पंढरपूर अशा पायी वारीला ८४७ वर्षाची परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांचे पंजोबा विठ्ठलभक्त त्र्यंबकपंत यांनी ती सुरू केली होती. त्रंबक पंतांना हरिहर पंत व गोविंदपंत अशी दोन मुले होती. त्यापैकी हरिहर पंतांनी राजनैतिक परंपरा जोपासत देवगिरीचे यादव राजेश सिंगल यांच्या दरबारी सरसेनापती पद भूषवले .तर गोविंदपंत यांनी वडिलांच्या भक्ती ज्ञानमार्ग उपासनेची परंपरा जोपासत पंढरपूरची वारी सुरू ठेवली. गोविंद पंत यांना ते वृद्धपकाली वारीला गेले असताना सोलापूर येथील सिद्धरामेश्वर यांच्या मंदिरात पांडुरंगाने साक्षात दर्शन दिले .आजही सोलापूर येथे सिद्ध रामेश्वराच्या मंदिरालगत गोविंद पंतांचे मंदिर आहे .गोविंद पंतांच्या नंतर विठ्ठलपंतांनी ही वारी पुढे सुरू ठेवली. संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून तळागाळातील समाजाला एकत्र करून याच वारीचे दिंडीत रुपांतर केले .त्यामुळे पांडुरंगाची खरी वारी आपेगावहूनच सुरू झाली असे मानले जाते.कालांतराने अनेक वर्ष आपेगावातून वारकरी पाई वारी करू लागले .तदनंतर १९६५ ला गुरु आज्ञा पाळत काही विष्णु महाराज कोल्हापूरकर हे आपेगावला आले. १९६७ पासून त्याकाळी गावकरी डोक्यावर माऊलींच्या पादुका घेत दर कोस ,दर मुक्काम करत पाई वारी करत कालांतराने या पाई वारीचे दिंडीत रूपांतर झाले. पंचक्रोशीतील विठ्ठल भक्त ज्ञानोबाच्या भक्तीरसात पंढरीला जायचे हीच परंपरा सुरू ठेवत संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमीतून भक्त त्रिंबक पंतांनी सुरू केलेली आपेगावहून पंढरपूर पायी वारीला जवळपास ८४७ वर्षांची परंपरा मानली जाते. हीच परंपरा जोपासत संत ज्ञानेश्वर जन्मभूमीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूरकर हे या वारीत आता गुरूच्या आज्ञापालन करत परंपरेने मातापित्याचा पालखी सोहळा पंढरपूरला मोठ्या संख्येने घेऊन जातात .यंदा आपेगावहून माऊलींच्या मातापित्यांच्या पालखीसह माऊलींच्या पादुकांचे २८ जून शुक्रवारी सायंकाळी माऊलीच्या जन्म ठिकाणाहून ज्ञानोबा माऊलींचा जयघोषात पंढरपूर साठी प्रस्थान ठेवणार असून २९ जून सकाळी पंढरपूरकडे रवाना होणार असून बीड अहमदनगर उस्मानाबाद सोलापूर जिल्ह्यातील १८ मुक्काम करत १६ जुलै रोजी पंढरपुरात पोहोचणार आहे. अशी माहिती दिंडी प्रमुख ह. भ. प. भानुदास ज्ञानेश्वर कोल्हापूरकर यांनी दिली.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 21 : बीड जिल्ह्यातील मान्यता प्राप्त शासकीय शासन अनुदानित, कायम विना अनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतन मध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागासवर्ग, जाती व भटक्या जाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये. स्वराज ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने वेळापत्रक जाहीर केलेले आहे. सदर योजनेअंतर्गत सन 2024-25 या शैक्षणिक वर्षाकरिता द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या 150 विद्यार्थ्यांना तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या 150 विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षापूर्वी घेतलेली 150 विद्यार्थ्यांना, तृतीया वर्षात बीड जिल्ह्यातील 150 विद्यार्थ्यांना व व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या 150 विद्यार्थ्यांना अशा पध्दतीने बीड जिल्ह्यातील 450 विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे शासनाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजने करिता पुढील प्रमाणे नमूद वेळापत्रकानुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष उच्च शिक्षणाचे द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष अर्ज स्विकारण्याची तारीख 21 जून 2024 अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख 15 जुलै 2024 असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, बीड या कार्यालयात ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

## सुनंदाताई राजेंद्र पवार यांच्या वाढदिवसा निम्मीत जि.प. शाळा मस्साजोग येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप




केज/प्रतिनिधीजि प मा शाळा मस्साजोग येथे सुनंदाताई राजेंद्र पवार यांच्या वाढदिवसा निम्मीत शाळेतील इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थी याना स्टीफीन डबा स्टीफीन बॅग पाणी बॉटल यांचे वाटप मिथून मनोहरराव देशमुख यांच्या हस्ते वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला शाळेतील मुख्याध्यापक श्री कोथींबीरे सर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन सोनवणे उपाध्यक्ष श्रीकांत सोनवणे सदस्य भिमराव गायकवाड संदीप देशमुख राहूल देशमुख अप्पासाहेब मोरे प्रमोद देशमुख रविंद्र देशमुख अण्णासाहेब गायकवाड राजेश भैय्या सोनवणे उद्योजक प्रमोद देशमुख ग्रामसेवक गव्हाणे साहेब शिंदे सर बनकर सर जाधवसर इंगोलेसर केदार सर श्रीम बनसोडे मॅडम सोनार मॅडम पिसे मॅडम देवगुडे मॅडम गदळे मॅडम केदार मॅडम व सर्व शिक्षण प्रेमी नागरीक उपस्थित होते.

# वसतीगृह प्रवेशासाठी विद्यार्थ्यानी संपर्क साधण्याचे आवाहन

**बीड (प्रतिनिधी)**

बीड, दि. 21, (जि. मा. का.) : बीड जिल्ह्यातील बाहेरील पात्र विजाभज इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी इयत्ता 12 वी नंतर उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील विजाभत व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासनातर्फे मुला मुलींची वस्तीगृह सुरू करण्यात आलेली असून सन 2024-25 शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशाचे वेळापत्रक हे सर्व शासकीय वस्तीगृह सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड येथे सूचनाफलकावर लावलेले आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शासकीय वस्तीगृह प्रवेश अर्ज इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय बीड येथे विनामूल्य उपलब्ध असून दिनांक 22 जून 2024 ते 25 जुलै 2024 या कालावधीत भरून द्यावयाचे आहेत. अर्ज करत असताना संबंधित विद्यार्थ्यांनी वस्तीगृह प्रवेश अर्जासोबत महाविद्यालयाचे बोनाफाईड, आधार कार्ड, बँक पासबुक, मागील वर्षाचे गुणपत्रक, मार्कशीट, टी.सी., शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, दोन फोटो, रहिवासी दाखला इत्यादी आवश्यक कागदपत्रे यांची छायांकित प्रतीसह प्रवेश अर्ज दिनांक 25 जुलै 2024 पर्यंत सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड यांच्या कार्यालयात सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत सादर करावेत.

दिनांक 25 जुलै 2024 नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही. माहितीसाठी सर्व शासकीय वस्तीगृह, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयात संपर्क साधावा. सदर वस्तीगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी व पालकांनी शासकीय वस्तीगृहामध्ये खालील पत्त्यावर संपर्क साधावा. मुलांचे शासकीय वसतिगृह, फरताडे कॉम्प्लेक्स, पालवण रोड बीड. गोविंद शरद लोळगे, मोबाईल क्रमांक 9604667615, मुलींचे शासकीय वस्तीगृह, लाटे कॉम्प्लेक्स, गोविंद नगर, धानोरा रोड बीड भाग्यश्री कचरू डोंबाळे मोबाईल क्रमांक 70 20 12 2018 यावर संपर्क साधवा.

## जिहयातील कर्जदारांनी या दंडव्याज माफीचा लाभ घ्यावा

बीड, दि. 21 : महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या खादी आयोग निधी कन्सोटियम बँक फायनान्स या दोन्ही योजनांसाठी मंडळांनी खादी आयोगाचे परिपत्रक क्र. फायनान्स/ पॉलिसी /1/ 2002-03 दिनांक 28 फेब्रुवारी 2003 व परिपत्रक क्र.अका/ एमएएच.केव्हीआयबी 22-23 दि.29. 4. 2022 अन्वये दंडव्याज माफी जाहीर केली आहे. जिल्हा बीड येथे प्रस्तुत योजनेत थकीत कर्जदार आहेत. कर्जदाराने एकरकमी भरणा केल्यास दंडव्याज माफी संबंधितांना लाभ होणार आहे. जिहयातील कर्जदारांनी या दंडव्याज माफीचा लाभ घ्यावा,असे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बीड यांनी केले आहे



# संस्कृती विद्यालय येथे आंतरराष्ट्रीय योग दिन विविध उपक्रमांनी साजरा

**बीड/प्रतिनिधी**

शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय येथे युवा कार्य व खेल मंत्रालय भारत सरकार नेहरू युवा केंद्र बीड व बालविकास सामाजिक प्रतिष्ठान संचलित संस्कृती विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला .

जगभरामध्ये २१ जून हा दिवस योग म्हणून साजरा करण्यात येतो . मानवाला एक निरोगी आयुष्य जगण्यासाठी योग महत्वाचा आहे. या प्रसंगी कार्यक्रमाला उपस्थित म्हणून जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र बीडच्या श्रीमती अरुणा कोचुरे बालविकास सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉक्टर दत्ता नलावडे सर ,भाजपा कामगार मोर्चा बीड मा.बालाजी पवार (भाजपा कार्यकर्ते) भाजपा लोकसभा पालक माननीय मा.दादासाहेब ननवरे (मराठवाडा अध्यक्ष भाजपा कामगार मोर्चा) मा. ओम प्रकाश गिरी जिल्हाध्यक्ष भाजपा कामगार मोर्चा सामाजिक कार्यकर्ते श्री . तत्वशील कांबळे ,राजश्री छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड प्रमोद जव्हेरी, यांची प्रमुख उपस्थिती होती . योगशिक्षक डॉ . दत्ता नलावडे सर यांनी मुलांच्या योगाचे प्रात्यक्षिक घेतले. तसेच श्रीमती अरुणा कचरे मॅडम यांनी सर्वधर्म प्रार्थना याचे सामूहिक पठण केले . डॉ .दत्ता नलावडे सर यांनी यावेळी बोलतांना जागतिक योग दिन (World Yoga Day) आपण 21 जून रोजी साजरा करतो. योगा हा आपल्या आयुष्यातील अविभाज्य भाग असायला हवा. कारण योगामुळे आणि ध्यानधारणेमुळे मानसिक आणि शारीरिक दोन्ही गोष्टी सुधारण्यास मदत मिळते. निरोगी आयुष्यासाठी योग महत्त्वाचे आहे. योगा हे आपले शरीर अधिक तंदुरुस्त राखण्यासाठी मदत करते. शीर्षासन, धनुरासन, भुजंगासन, मलासन, ध्यानधारणा, सूर्यनमस्कार असे अनेक योगप्रकार आहेत योगामुळे आपले जीवन समृद्ध होते असे सांगितले . सहभागी सर्वांना नेहरू युवा केंद्र मार्फत सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले .

या कार्यक्रमामुळे मुलांना योगाचे महत्त्व कळण्यास मदत झाली . या प्रसंगी जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# रोहन गलांडे यांच्या अमरण उपोषणाला आले यश ! काम पुर्ण होईपर्यंत आमरणउपोषणाला स्थगिती-रोहन गलांडे पाटील

## मा.आमदार पृथ्वीराज साठे व जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे उपस्थित

**केज/प्रतिनिधी**

केज तालुक्यात चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज तीर्थ क्षेत्राचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे यासाठी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील दि.१७ /०६/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ६ वाजता आमरण उपोषणास बसले होते व आज त्यांच्या आमरण उपोषणाला यश आले आहे व त्यांच्या मागण्या आशा होत्या की की श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाचा मंजूर निधी श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्रा साठीच खर्च करण्यात यावा, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत गावकऱ्यांची ऐक समीती असेल, तीर्थक्षेत्राचे काम निकृष्ट दर्जाचे होऊ नये याला जबाबदार काम करणारा गुत्तेदार जबाबदार राहील, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण झाल्यानंतर गावकऱ्यांना खर्च झालेल्या निधीची माहिती देण्यात यावी.अशा मागण्या असुन रोहन गलांडे यांनी म्हटले आहे की चिंचोली माळी गावचा नागरीक म्हणून माझ्या एवढ्या मागण्या प्रशासनाला मान्य असतील तर मी माझ्या श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र निधी ५० लाख निधी साठी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत स्थगिती देणार आहे अशा मागण्या रोहन गलांडे पाटील यांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी अतुल मुंडे व ढाकने साहेब यांनी रोहन गलांडे यांना लेखी पत्र देऊन मागण्या मान्य केल्या आहेत त्यामुळे रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे १९/०६/२०२४ रोजी उपोषनाला स्थगिती दिली यावेळी रोहन गलांडे यांनी सहकारी जेष्ठ पत्रकार, संपादकीय विभाग,व सहकारी वृत्तपत्र दैनिकाचे प्रथम नतमस्तक होऊन आभार व्यक्त केले यावेळी उपस्थित उपस्थित शरद चंद्रजी पवार राष्ट्रवादी गटाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब, ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, जेष्ठ नेते सुरेष तात्या पाटील, माजी सरपंच सुनील बापु देशमुख, ठाकरे गटाचे शिवसेना तालुकाप्रमुख अशोक जाधव,जेष्ठ समाजसेवक हनुमंत भोसले सर,जेष्ठ पत्रकार रामदासजी तपसे, युवा नेते युवराज मगर सर, तात्या रोडे, गावातील प्रतीष्ठीत नागरीक निष्ठावंत शिवसैनिक लक्षीमन गलांडे, जेष्ठ नेते राममेजर राऊत, जेष्ठ शिवाजी आबा गायकवाड पत्रकार अनिलजी गलांडे सर ,राजाभाऊ मोटे,ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत,नाना नेमट,युवा नेते दत्ता गलांडे,अमर घोडके,रवी गायकवाड, रमेश देशमुख,डिंगाबर मगर,बाळासाहेब घोडके,राम नखाते असे समस्त गावकऱ्यांचा उपस्थित सहकारी रोहन गलांडे पाटील यांनी अमरण उपोषणाला स्थगिती दिली आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

**बीड/प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा बीड शहर शाखेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील व परिसरातील दहावी व बारावी परीक्षेमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा बुधवार दिनांक २६ जून २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या गुणपत्रिकेची प्रत भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. तरी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत ही संयोजक ॲड.केतन गायकवाड शहराध्यक्ष ९२२६३६४४१६, यशवंत कदम तालुकाध्यक्ष ९८५०५३६१३२, संदेश डोळस तालुका सरचिटणीस ८६००९३४९९६ संतोष जोगदंड ९८६०५४३६२२, दिपक कांबळे ९८६०४७६२२८, यांच्या नंबर वर संपर्क साधून किंवा व्हाह्ट्सअप द्वारे दिनांक २४ जूनपर्यंत आपण जमा करू शकतात. असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने करण्यात आले आहे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आलेल्या कवींना प्रमुख पाहुण्यांचे स्थान देण्यात आले नंतर त्यांच्या राष्ट्रभक्तीपर स्वरचित कवितांचे वाचन घेऊन त्यांचा शाल पुष्प सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला .

## तहसील कार्यालय केज मधील पुरवठा विभागातील कामकाज ठप्प

बीड जिल्हातील ता. केज मध्ये तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात रेशन कार्ड संदर्भात कामे केली जातात. परंतु तेथील लॉगिन बंद असल्या कारणाने सर्व कामे खोळबळी आहेत. जसे कि रेशन कार्डात नाव वाढवीने, नाव काढणे, नवीन रेशन कार्ड काढणे, रेशन कार्ड द्वितीय प्रत अशा सर्व कामे होणे अवघड झाले आहे. तसेच विद्यार्थ्यांची शाळा, कॉलेज ची प्रवेश प्रकिया सुरु असल्या कारणाने रेशन कार्ड संदर्भात त्यांना प्रवेश घेण्यास अडचण निर्माण होत आहे. दवाखान्यात पेशंटला उपचारा दरम्यान महात्मा फुले योजना, जन आरोग्य योजना लाभ घेणे कठीण झाले आहे. अशा प्रकारे जनतेला त्रासाला तोंड द्यावे लागत आहे.

पुरवठा विभागातील लॉगिन तात्काळ सुरु करून, जनतेचे कामे सुरुळीत सुरु करावे असे सर्वसामान्य जनतेमध्ये सुर आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार २२ जून २०२४    पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# ओबीसींची आजची बैठक मॅनेज होती एकही नोंद रद्द झाली तर तुम्हाला महागात पडेल मनोज जरांगे पाटील यांचा इशारा!

## ‘एकही नोंद रद्द झाली तर तुम्हाला महागात पडेल’

“माझ्यासोबत कुणीच नाही राव. तुम्हाला वाटतं सरकार आहे. तुमचं लेकरू म्हणून सांगतो. मी जनतेसाठी काम करतो, म्हणून मी ओबीसी, धनगर, लिंगायत समाजाच्या मागण्या मांडत आसतो. माझ्या पाठीशी फक्त मराठा समाज आहे. एकही नोंद रद्द झाली तर तुम्हाला महागात पडेल. आमच्या नोंदी खऱ्या आहेत, आणि आमची एकही नोंद रद्द झाली तर मंडळ कमिशनने दिलेल्या बोगस आरक्षणावर कारवाई व्हायला हवी”, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.



## मनोज जरांगे पाटील आणखी काय म्हणाले?

“सगेसोयरे रद्द करा म्हणजे तो काहीही बोलतो. त्याने सगळ्या जाती एकमेकांच्या अंगावर टाकल्या आहेत. याची मागणीच मुळात अशी आहे. खोट्या मागण्या आहेत. जन्मल्यापासून मराठ्यांना विरोध करणे एकाच काम आहे त्यांचे. आमच्या खोट्या प्रमाणपत्राची चौकशी करा म्हणतात. तर 14 टक्के आरक्षणची पण करा. वरचे बोगस 16 टक्के आंदोलन कसे आले सांगा. एकूण 52 टक्के आरक्षण कसे झाले ते पण सांगा, कारवाई करा, तपासणी करा, दूध का दूध आणि पाणी का पाणी करा. त्यावेळीही जनगणना केली का की इंग्रजांची घेतली तेही सांगा. तुमचं खरं आणि आम्ही खोटे, असं सुरुय”, असं मनोज जरांगे म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज सह्याद्री अतिथीगृह येथे ओबीसी नेत्यांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीवर मनोज जरांगे पाटील यांनी टीका केली. “आजची बैठक मॅनेज बैठक होती. सरकारला मराठ्यांना आरक्षण द्यायचे नाही. सगेसोयरे द्यायचं नाही. मराठ्यांना काहीही मिळू द्यायचे नाही, यासाठी ही बैठक दाखवायला घेतली. आम्हाला काहीच देऊ नका म्हणतात. तर मग काय करावे आम्ही, आमचं काहीच खोटं नाही, तुमची मागणी काय आहे, तुमची मागणी आमच्यात झुंज लावायची आहे. सरकारमधील ज्या मंत्र्यांनी हे आंदोलन बसवलं, त्यांनी ही बैठक मॅनेज केली. आम्हाला येवल्या वाल्यासारखी पोटजळी नाही. त्यांना काहीही मिळाले तर आम्हाला त्रास नाही. पण आम्हाला काही मिळाले की ते विरोध करतात”, अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली. “हे सुरू असलेले आंदोलन कशासाठी आहे कळायला मार्ग नाही. आमच्याकडे आले म्हणून तुमच्याकडे यायला हवे या काय मागण्या आहेत. मराठ्यांना आवाहन आहे, मतासाठी आणि निवडून येण्यासाठी जातीचे वाटोळं करू नका. आमचं जातप्रमाणपत्र बोगस नसून बोगस म्हणतात म्हणून म्हणतो मॅनेज बैठक आहे. ओबीसी नेत्यांच्या दबावात सगळं सुरु आहे”, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. “भुजबळ काय सांगतात त्यावर विश्वास नाही. मराठा कुणबी एकच आहे हे आम्ही सिद्ध करतो. नाहीतर तुम्ही सिद्ध करा. आम्ही सगळ्यांचा आदर करतो. सन्मान करतो. मी कुणालाही दुखावलं नाही. सर्वांनी एकत्र बसावं, असं सरकारला वाटते, ओबीसी नेत्यांना वाटते तर आम्हीही बसायला तयार आहोत”, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. “ओबीसींच्या बैठकीत काय चर्चा झाली ते मला माहिती नाही. सरकारने आमच्या हक्काचे आरक्षण आम्हाला द्यावे. समिती त्यांच्यासाठी असेल तर असावी. आमचा काही आक्षेप नाही”, अशी देखील भूमिका मनोज जरांगे पाटील बैठकीवर मांडली.

# सरपंच उपसरपंजांच्या तटस्थ कारभारामुळे उमरा येथील विकास खोळंबला

## तर स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानंतर ही गावात स्मशानभूमी नाही

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : लोहा तालुक्यातील सर्वात मोठी गट ग्रामपंचायत जिल्हा परिषद सर्कल मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या व नावाजलेल्या गावाचा विकास केवळ सरपंच व उपसरपंचांच्या तटस्थ भूमिकेमुळे कोळंबला असल्याच्या प्रतिक्रिया जनतेतून ऐकावयास मिळत आहेत. गावाचा विकास होत नसल्यामुळे २०२२ च्या निवडणुकीत उमरा ग्रामस्थांनी जुन्यांना कंटाळून नवीन नवयुवक पॅनलला निवडून देऊनही जवळपास २ वर्षाचा कालावधी लोटला असून त्यांच्याकडूनही कुठल्याही प्रकारचा विकास होतांना दिसत नाही,निवडून येण्यापूर्वी सत्ताधाऱ्यांनी दाखविलेल्या आश्वासनाची अद्याप पर्यंत पूर्तता होताना दिसत नाही.गावातील समस्या तशाच ताटकळत आहेत. स्वातंत्र्याच्या ७५ वर्ष उलटून गेल्यानंतरही गावात स्मशानभूमी नाही याबाबतीत गावकऱ्यांनी अनेक वेळा ग्रामपंचायत तहसीलदार जिल्हाधिकारी शासनाच्या सर्वच विभागामध्ये पत्रव्यवहार करूनही गावकऱ्यांची ही समस्या सुटत नाही. गावातील स्मशानभूमी प्राथमिक आरोग्य केंद्र राष्ट्रीयकृत बँकेच्या संदर्भात संभाजी ब्रिगेडचे बालाजी सिरसाट यांनी मंत्रालयापर्यंत वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही सत्ताधारी ग्रामपंचायत कुठल्याच प्रकारचा पाठपुरावा करत नसून सहकार्य करत नसल्याची खंत यावेळी त्यांनी बोलून दाखवली. सध्या पावसाळ्याचे दिवस असून एखादी दुःखद घटना घडल्यास मयत इसमाचा अंत्यविधी कुठे करावा हा प्रश्न गावकऱ्यांसमोर पडतो अंदाजे पाच वर्षांपूर्वी असाच एका वयोवृद्ध महिलेचा अंत्यविधी चालू असतानाच गावाशेजारील नदीला पूर येऊन प्रेत वाहून गेल्याची घटना गावकऱ्यांनी डोळ्यांनी पाहिली आहे.सामान्य जनतेसाठी पाणी वीज रस्ते,नाल्या, स्वच्छालय हे कामे करणे अपेक्षित असूनही त्याकडे मात्र ग्रामपंचायतचे दुर्लक्षच होताना दिसत आहे. ज्यांच्याकडून विकासाच्या अपेक्षा होत्या,त्यांना निवडून देऊन गावाने चूकच केली की काय,अशा संत्रप्त भावना नागरिकांतून ऐकायला मिळत आहेत.

## आता सरकार तुम्हालाही पाणी पाजेल, जरांगे पाटलांनी लक्ष्मण हाकेंना काय दिला सावधगिरीचा सल्ला?



सरकारने आतापर्यंत आम्हाला पाणी पाजलं आता तुम्हालाही पाणी पाजतील, असं वक्तव्य करत मनोज जरांगे पाटील यांनी लक्ष्मण हाके यांना सावधगिरीचा सल्ला दिला आहे. सरकारकडून मराठा समाज आणि ओबीसी समाजाची फजिती सुरू आहे, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मनोज जरांगे म्हणताय आम्ही ओबीसी समाजात आलो आहोत आणि सगेसोयऱ्यांच्या आधारे आम्ही ओबीसीमध्ये पूर्ण घुसणार आहोत तर दुसरीकडे सरकार म्हणतंय ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, नेमकं खरं कोण बोलतंय? असा सवालच लक्ष्मण हाके यांनी केला आहे. जालन्याच्या वडीगोद्री गावात ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचं गेल्या आठ दिवसांपासून उपोषण सुरु आहे. त्यांच्या उपोषणाचा आज नऊवा दिवस आहे. राज्य सरकारने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली आहे. या दरम्यान, लक्ष्मण हाके यांनी मराठा नेते मनोज जरांगे यांच्यावर निशाणा साधला त्यावेळी ते बोलत होते.



# पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवा; देवेंद्र फडणवीस यांची कोणाकडे विनंती?

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवा, अशी विनंती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्राला केली. अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. पंकजा मुंडे यांना आणि OBC समाजाला प्रातिनिधीत्व देणं गरजेचं असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा बीड लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला. त्यानंतर पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पंकजा मुंडे यांचं काम चांगलं असून भाजप पक्षातील मोठ्या नेत्याही आहेत. त्यामुळे भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवा, अशी मागणी आता केली जात आहे. अशाप्रकारची विनंती देखील पक्षश्रेष्ठींकडे करण्यात आली आहे. राज्यसभा किंवा आता ज्या कोणत्या जागा रिक्त होतील, तेव्हा पंकजा मुंडेंची वर्णी लावावी, अशी विनंती फडणवीसांनी भाजपच्या वरिष्ठ पक्षश्रेष्ठींकडे केल्याची माहिती मिळत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com